# वर्गीकरण–अंतर्गत एचडीएफसी बँकेसोबत पॉझिटीव पे

## आता पॉझिटीव पे सोबत तुमच्या चेकचं पेमेंट सुरक्षित करा

ही सुविधा ग्राहकांना चेक पेमेंटमध्ये सुरक्षितता पुरवण्यासाठी आणि चेकच्या पानांशी छेडछाड केल्यामुळे होणाऱ्या फसवणुकीच्या घटना कमी करण्यासाठी आहे. एचडीएफसी बँकेने ₹50,000 आणि त्याहून अधिक मूल्याच्या सर्व धनादेशांसाठी पॉझिटीव पे ची यंत्रणा सादर केली आहे. धनादेश जारी करताना ग्राहकाने दिलेल्या माहितीच्या आधारे धनादेश काढणाऱ्या बँकेद्वारे पेमेंटसाठी प्रक्रिया केली जाईल.

ग्राहकाने चेक क्लिअरिंगमध्ये सादर होण्यापूर्वी किमान 24 कामकाजाच्या तासांपूर्वी जारी केलेल्या चेकचे खालील तपशील शेअर करावेत.

जेव्हा प्राप्तकर्ता सीटीएस क्लिअरिंग द्वारे वसुलीसाठी धनादेश सादर करतो, तेव्हा तपशील (खाते क्रमांक/चेक क्रमांक आणि धनादेशाची रक्कम) सत्यापित केले जातील जे पॉझिटीव पे द्वारे बँकेला दिलेले आहेत.

कृपया सीटीएससाठी पॉझिटीव पे यंत्रणेकरिता खालील गोष्टींची नोंद घ्यावी:

**स्टेप 1:** धनादेश लिहिल्यानंतर धनादेश देणाऱ्याने (ड्रॉअर) चेकचे खालील विशिष्ट तपशील संलग्न केलेल्या एक्सेल शीटसह खालील नमून्याच्या ईमेल स्वरूपात सादर करणे आवश्यक आहे, जी चेक जारी केल्याची खात्री मानता येईल.

* खाते क्रमांक (ग्राहकाचा खाते क्रमांक)
* चेक क्रमांक
* चेकची तारीख–(चेक जारी केल्याची तारीख)
* चेकची रक्कम–(रकमेमध्ये कॉमा टाकून स्वतंत्र करू नका)
* लाभार्थीचे नाव–(खातेधारकाकडून जारी केलेल्या चेकचा लाभार्थी)

हा तपशील बँकेच्या खालील ईमेल आयडीवर पाठवा:

* Positivepaynorth@hdfccank.com

उत्तर भारतातील म्हणजे पंजाब, उत्तर प्रदेश, हरियाणा, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मिर, राजस्थान, उत्तराखंड, दिल्ली येथील ग्राहकांसाठी.

* Positivepaysouth@hdfccank.com

दक्षिण भारतातील म्हणजे तामिळ नाडू, केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा येथील ग्राहकांसाठी

* Positivepayeast@hdfccank.com

पूर्व भागातील म्हणजे पश्चिम बंगाल, ओडिशा, आसाम, बिहार, झारखंड, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, त्रिपुरा, सिक्कीम येथी ग्राहकांसाठी.

* Positivepaywest@hdfccank.com

पश्चिम भागातील म्हणजे महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, गोवा, छत्तीसगढ येथील ग्राहकांसाठी.

(कृपया लक्षात ठेवा: वर नमूद केलेले ईमेल आयडी प्रादेशिक ईमेल आयडी आहेत आणि म्हणून कृपया तुमच्या स्थानानुसार संबंधित ईमेल आयडींना ईमेल पाठवा.)

**स्टेप 2:** ड्रॉअरच्या पॉझिटीव पे विनंतीची पोहोच ऑटो–अॅकनॉलेजमेंटद्वारे दिली जाईल.

**स्टेप 3:** चेक जारीकर्त्याच्या (ड्रॉअर) नोंदणीकृत ईमेल आयडीवरून ईमेल मिळाल्यावर, बँक तपशीलांची पडताळणी करेल.

**स्टेप 4:** बँक पॉझिटिव्ह पे विनंती स्वीकारेल किंवा नाकारेल आणि स्वीकृती किंवा नकाराची खात्री चेक जारीकर्त्याला (ड्रॉअर) ईमेलद्वारे पाठविली जाईल.

**स्टेप 5:** डेटा विसंगतीमुळे नकार मिळाल्यास, जारीकर्त्याला (ड्रॉअर) चेकचा योग्य तपशील देऊन ईमेलद्वारे नवीन पॉझिटीव पे विनंती सुरू करावी लागेल. अन–नोंदणीकृत ईमेलच्या खात्यावर नकार दिल्यास, ग्राहकाने फक्त त्यांच्या नोंदणीकृत ईमेल आयडीवरून नवीन विनंती सुरू करणे आवश्यक आहे.

**टीप:** ही सेवा फक्त ₹50,000/– आणि **त्याहून अधिकच्या सीटीएस क्लिअरिंग** अंतर्गत प्राप्त झालेल्या चेकसाठी लागू आहे.

* पॉझिटीव पे 01 जानेवारी 2021 पासून अंमलात आले आहे.
* सध्या पॉझिटीव पे सिस्टमची (पीपीएस) खात्री, ग्राहक नोंदणीकृत ईमेल आयडी, नेट बँकिंग आणि मोबाइल बँकिंगद्वारे देऊ शकतात
* ग्राहकांना सल्ला देत आहोत की तपशील फक्त इंग्लिश भाषेत द्या
* कृपया पेयीच्या (लाभार्थीच्या) नावाचा तपशील प्राप्त झालेल्या चेकमध्ये असलेल्या समान पध्दतीने पुरवा.
* a-z,A-Z,0-9,_(अंडरस्कोअर), ब्लँक स्पेस, (अॅपोस्ट्रॉफी), कॉमा, फूल स्टॉप...वगळता पेयीच्या नावात विशेष कॅरॅक्टर्सची परवानगी नाही.

==================================================================================

**महत्त्वाच्या सूचनांसह जोडलेल्या बँकेला पॉझिटीव पे ची विनंती सादर करण्यासाठी ग्राहकांनी अवलंब करावयाचा नमूना ईमेल फॉरमॅट.**